CMYK

राज्यातील एम.फिल अर्हता धारक प्राध्यापकांचा मार्ग मोकळा: पंचवीस वर्षापासून प्रलंबित प्रश्न निकाली
>> पान 2

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून आषाढी वारीसाठी प्रशासनाने केलेल्या सुविधांची पाहणी
>> पान 3

मुलांना त्यांच्या आवडीनुसार स्वप्न निवडू द्या! - भार्गव राजे
>> पान 4

**सुविचार**
नेहमी आपल्या कर्तव्याचे पालन करा.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034




रिंकू राजगुरु २० वर्षांनी वारीला निघाली, तल्लीन होऊन भक्तीरसात रमली

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 292 ■ शुक्रवार, दि. 04 जुलै 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## राज्यातील धरणांमधील आवक वाढली

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : राज्यभरात गेल्या दोन दिवसांपासून जोरदार पाऊस होत आहे . धरणांच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या पावसामुळे गोदावरी नदीच्या पूर परिस्थितीत वाढ झाली आहे . गंगापूर धरणातून दुपारी बारा वाजता ३७१६ वेगाने पाण्याचा विसर्ग गोदावरीत सुरू झालाय . नाशिकमध्ये रामकुंड परिसरातील छोटे मोठे मंदिर पुन्हा पाण्याखाली गेले आहेत. दुतोंड्या मारुतीच्या गुडघ्यापर्यंत पुराचे पाणी लागले आहे. दुसरीकडे आषाढी एकादशीच्या निमित्ताने येणाऱ्या भाविकांमुळे उजनी धरणात होणारा पाण्याचा विसर्ग बंद करण्यात आलाय . राज्यात बहुतांश धरणांमध्ये पाण्याची आवक वाढली आहे .काही धरणांमधून विसर्ग सुरू झालाय .नदीच्या पाणीसाठ्यातही वाढ झाली आहे .**

### रायगडातील १७ धरणं फुल्ल, गोसेखुर्द धरणाचे ९ दरवाजे उघडले

राज्यातील बहुतांश मोठ्या धरण प्रकल्पांमध्ये ५० टक्क्यांहून अधिक जलसाठा असल्याची माहिती जलसंपदा विभागाने दिली . पुण्यात गेल्या वर्षी १५ टक्क्यांवर असलेला उपयुक्त जलसाठा यंदा ५८.२१ टक्क्यांवर आहे . नाशिकच्या ही बहुतांश धरण क्षेत्रांमध्ये चांगला पाऊस झाल्याने गेल्यावर्षी १७ टक्क्यांवर असलेला पाणीसाठा यंदा ५२.५४ टक्क्यांवर आहे . मराठवाड्यातील ही बहुतांश धरणांमध्ये पाण्याची आवक वाढत आहे .

रायगड जिल्ह्यातील १७ धरणं फुल्ल !

रायगड जिल्ह्यात रात्री मुसळधार पावसाने अलिबाग मुरुड रोहा नागोठणे परिसराला झोडपून काढले .त्यामुळे धरणांच्या पातळीत कमालीची वाढ झाली आहे .जिल्ह्यातील २८ धरणांपैकी १७ धरण १०० टक्के भरली असून रायगड जिल्ह्याला पाणीपुरवठा करणारे उन्नई धरण क्षमतेपेक्षा अधिक भरले आहे . धरणातून होणाऱ्या विसर्ग मुळे कुंडलिका नदी पातळीत मोठी वाढ झाली असून पाणी नदीपात्राच्या इशारा >> पान २



## शालार्थ आयडी घोटाळा प्रकरण; नागपूर शिक्षण मंडळाच्या तत्कालीन विभागीय अध्यक्षांना पुन्हा अटक

**नागपूर/प्रतिनिधी :** बोगस शालार्थ आयडी घोटाळ्याची पायमुळं राज्यभरात विस्तारलेली आहेत. त्यामुळं शिक्षण विभागाची अब्रू वेशीवर टांगली आहे. या प्रकरणाबाबत रोज नवनवीन धक्कादायक माहिती समोर येत आहे. त्यामुळं घोटाळ्याची व्याप्ती वाढत आहे. तसंच विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात हा मुद्दा गाजत आहे. तर दुसरीकडं नागपूर पोलिसांनी कारवाईचा धडाका सुरूच ठेवला आहे.

शिक्षक भरती प्रक्रियेमध्ये बनावट कागदपत्रांचा वापर करून अपात्र उमेदवारांची नियुक्ती केल्याचा आणि त्यांची नावं शासकीय शालार्थ प्रणालीमध्ये समाविष्ट करून राज्य शासनाच्या निधीचा मोठा अपहार झाल्याचा घोटाळा उघडकीस आला. या गंभीर प्रकरणात तत्कालीन शिक्षण उपसंचालक तथा नागपूर शिक्षण मंडळाचे विभागीय अध्यक्ष चिंतामण वंजारी यांचा थेट सहभाग असल्याचं निष्पन्न झालं. त्यामुळं त्यांना पोलिसांनी पुन्हा अटक करून पोलीस कोठडीत ठेवलं आहे.

## जयंत पाटील भाजपाच्या वाटेवर? मंत्री आशिष शेलारांशी भेट घेतल्याने राज्यातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या राजकीय वतुर्ळात एक महत्त्वाची घडामोड घडली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते आणि माजी मंत्री जयंत पाटील यांनी भारतीय जनता पार्टीचे मंत्री आशिष शेलार यांची भेट घेतली. या भेटीमुळे राज्यातील राजकीय वतुर्ळात नवीन चर्चेला सुरुवात झाली आहे.

जयंत पाटील हे राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ नेते असून त्यांनी पूर्वी राज्यात मंत्री म्हणून काम केले आहे. त्यांच्या राजकीय कारकिर्दीत त्यांनी विविध मंत्रालयांमध्ये म हत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. गेल्या काही काळापासून राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत राजकारणामुळे त्यांची स्थिती चर्चेत होती.

दुसरीकडे, आशिष शेलार हे भारतीय जनता पक्षाचे प्रभावशाली नेते असून सध्या ते महाराष्ट्र सरकारमध्ये मंत्री आहेत. त्यांनी पक्षाच्या संघटनेत आणि सरकारमध्ये म हत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. मुंबई शहरातील राजकारणात त्यांचा मोठा प्रभाव आहे.

या दोन्ही नेत्यांमधील भेटीनंतर राजकीय वतुर्ळात अनेक तर्कवितर्क लढवले जात आहेत. राजकीय निरीक्षकांच्या मते, ही भेट केवळ सामान्य शिष्टाचाराची असू शकते, परंतु त्यामागे काही मोठा राजकीय बेत असण्याचीही शक्यता नाकारता येत नाही.

## दिशा सालियन प्रकरणात आदित्य ठाकरेंना मोठा दिलासा, मुंबई पोलिसांची कोर्टात महत्त्वाची माहिती

**मुंबई/प्रतिनिधी :** दिशा सालियन मृत्यूप्रकरणी तिचे वडील सतीश सालियन यांनी दाखल केलेल्या याचिकेवर भूमिका स्पष्ट करण्यासाठी हायकोर्टानं राज्य सरकारला दोन आठवड्यांची अंतिम मुदत दिलीय. बुधवारी या प्रकरणावर न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती राजेश पाटील यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. याप्रकरणी हायकोर्टानं राज्याच्या मुख्य सचिवांना उत्तर देण्याचे आदेश दिलेले असतानाही मालवणी पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी उत्तर दिल्याची बाब याचिकाकर्त्यांनी हायकोर्टाच्या निदर्शनास आणून दिली. तसेच या प्रकरणी आदित्य ठाकरेंनी दाखल केलेल्या हस्तक्षेप याचिकेवरही सतीश सालियन यांच्यावतीनं वकील निलेश ओझा यांनी कोर्टात उत्तर दाखल केलं आहे. ज्यात आदित्य ठाकरे हेच या प्रकरणातील मुख्य आरोपी असल्यानं त्यांना यात याचिका दाखल करण्याचा अधिकारच नसून त्यांची याचिका फेटाळून लावण्याची विनंती करण्यात आली आहे.

## वारीमध्ये अर्बन नक्षलवादी घुसल्याचा मनिषा कायदेंचा दावा, शरद पवारांची पहिली प्रतिक्रिया समोर

**पुणे/प्रतिनिधी :** वारीमध्ये अर्बन नक्षलवाद घुसल्याचा दावा शिवसेनेच्या आमदार मनिषा कायंदे यांनी केला होता. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख शरद पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. वारीतील घुसखोरीबाबत काल दोन संस्थांची नावे बाहेर आली आहेत. त्यातील लोकायत एक संस्था आहे. ती संस्था अनेक चांगली कामे करत आहे, ती नक्षली नाही. मागे काही लोकांना अनेक वर्षे तुरुंगात टाकलं होतं. नक्षली शिक्के मारण्याचं काम केलं जातं असल्याचे शरद पवार म्हणाले. श्यामसुंदर सोन्नर हे अनेक वर्षापासून चांगलं काम




करत आहेत. चांगली काम करणाऱ्यांवर शिक्के मारले जात आहेत असे पवार म्हणाले.

सरकारनं त्रिभाषा धोरणाबाबतचा निर्णय रद्द केल्यानंतर ठाकरेंची शिवसेना आणि मनसे ५ जुलै रोजी विजयी मेळावा साजरा करणार आहे. मुंबईतील वरळी डोम येथे ठाकरेंची शिवसेना आणि मनसे यांचा एकत्रित भव्य मेळावा होणार आहे. या मेळाव्यावा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष उपस्थित राहणार का? याबाबत खुद्द शरद पवारांनाच विचारण्यात आले. यावेळी शरद पवार म्हणाले की, काल पार्टीचे अध्यक्ष जयंत पाटील मला भेटले होते. त्यांनी सांगितलं आहे की, जे आंदोलन सुरू आहे त्याला पक्षाने पाठिंबा दिला आहे. त्यामध्ये सहभागी देखील होणार आहेत. त्यामुळं पक्षांच्या अध्यक्षांचा आदेश मी मानतो असे शरद पवार म्हणाले. मी त्या कार्यक्रमाला जाणार नाही, कराण माझे >> पान २

## विठुरायाची भेट अपूर्णच राहिली! पंढरपुरच्या वारीत ट्रकनं चिरडलं

### धाराशिवच्या महिला वारकऱ्याचा अपघाती मृत्यू

**धाराशिव/प्रतिनिधी :** आषाढी वारीसाठी संपूर्ण महाराष्ट्रभरातून वारकरी पंढरपूरच्या दिशेने निघाले आहेत. मृदुंगाचा गजर, टाळ-चिपळ्यांचा नाद, विठुनामाचा गजर आणि माऊली माऊलीच्या जयघोषात विठुरायाच्या भेटीसाठी निघालेल्या पंढरीच्या वाटेवर एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. वारीला निघालेल्या धाराशिवच्या एका महिला वारकऱ्याचा वारीच्या मार्गावरच अपघाती मृत्यू झाला आहे. उषा अशोक व्यवहारे (रा. सिंदफळ, ता. तुळजापूर) असे



मृत महिलेचे नाव आहे. यंदाच्या आषाढी वारीसाठी आपल्या गावातील इतर महिलांसोबत पायी पंढरपूरच्या दिशेने निघाल्या होत्या.

पंढरीच्या वाटेवर धाराशिवच्या वारकरी महिलेचा अपघाती मृत्यू झाला. शनिवारी रात्री सुमारे १.३० वाजण्याच्या सुमारास वाखरीजवळ रस्त्यावरून जात असताना त्यांना वाहनाने धडक दिली. रोड कॉस करताना महिलेला दिंडीतील वाहनाने(ट्रक) चिरडले. या अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून पुढील तपास सुरू आहे. उषा व्यवहारे यांचा अकस्मात मृत्यू झाल्याने त्यांच्या कुटुंबीयांवर आणि वारीत सहभागी झालेल्या इतर >> पान २

## राज्यात यापुढे २४ तास वाळू वाहतूक; महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची घोषणा

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** राज्यात वाळू वाहतुकीसंदर्भातील दीर्घकाळ प्रलंबित असलेला निर्णय अखेर घेण्यात आला असून, सकाळी ६ ते सायंकाळी ६ या कालावधीत उत्खनन केलेल्या वाळूची वाहतूक आता २४ तास करता येणार आहे, अशी घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत केली आहे. त्यामुळे वाळू वाहतुकीचा प्रश्न मार्गी लागला असून जनतेला आता सहज वाळू उपलब्ध होणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. सद्यस्थितीत सकाळी ६ ते सायंकाळी ६ या वेळेतच वाळूचे उत्खनन परवानगीने होते. पण दिवसभरात साठवलेली वाळू रात्री उचलता न आल्यामुळे वाहतूक क्षमतेचा योग्य उपयोग होत नाही आणि त्यामुळे अवैध वाहतूक वाढते. ही



परिस्थिती बदलण्यासाठी महाखनीज पोर्टलवरून २४ तास ईटीपी तयार करता येईल अशी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.''असे बावनकुळे म्हणाले. वाहतुकीच्या पारदर्शकतेसाठी शासनाने विविध उपाययोजना केल्या असून, प्रत्येक वाळूघाटाचे जिओ-फ`न्सिंग केले जाणार आहे. घाट व मार्गांवर सीसीटीव्ही बसवले जाणार वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांना डिव्हाइस अनिवार्य करण्यात येणार. राज्यात नैसर्गिक वाळूची मर्यादा लक्षात घेऊन, शासनाने कृत्रिम वाळू धोरण राबविण्याचा निर्णय घेतला आहे. प्रत्येक जिल्ह्यात ५० क्रशर युनिट्स उभारण्यात येणार असून त्यासाठी ५ एकर जमीन दिली जाणार आहे. तीन महिन्यांत १००० क्रशर युनिट्स सुरू करण्याचे उद्दिष्ट आहे.नवीन वाळू धोरणावर सभागृहात चर्चा व्हावी अशी सदस्यांची मागणी मान्य करत, ''आपण या धोरणावर कोणत्याही वेळी चर्चा करण्यास तयार आहोत. जनतेकडून आलेल्या १२००हून अधिक सूचना विचारात घेऊन अंतिम धोरण निश्चित करण्यात आले आहे,'' असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

### घरकुलांसाठी मोफत वाळू

महसूलमंत्री बावनकुळे यांनी स्पष्ट केले की, घरकुल योजनेअंतर्गत प्रत्येक लाभार्थ्याला ५ ब्रास वाळू मोफत दिली जाणार आहे. एनजीटीच्या अटीमुळे १० जूननंतर काही घाटांवर मर्यादा आल्या असल्या तरी ज्या ठिकाणी पर्यावरण परवानगी आवश्यक नाही, अशा घाटांवरून घरकुलांना वाळूचा पुरवठा थांबवण्यात येणार नाही. चंद्रपूर जिल्ह्याचे उदाहरण देताना त्यांनी सांगितले की, ''नवीन वाळू धोरणामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील पहिल्या निविदेतूनच राज्याला १०० कोटी रॉयल्टी मिळाली आहे. हे धोरण अर्थसंकल्पीय दृष्टिकोनातूनही राज्यासाठी लाभदायक ठरणार आहे.''

## हिंदीला विरोध आणि इंग्रजीला आलिंगन! ; महाराष्ट्राच्या विधानसभेत ९ आमदारांना मराठी नकोशी

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या विधानसभेत कामकाजाची पत्रिका इंग्रजी भाषेत मिळावी, यासाठी ९ आमदारांनी विनंती केली असल्याची माहिती अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सभागृहात दिली. आज (गुरुवार, दि. ३ जुलै) विधानसभेत इंग्रजी भाषेत असलेली कामकाजपत्रिका पाहून भाजपचे आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी 'कामकाजपत्रिका इंग्रजीतून का?', असा प्रश्न औचित्याच्या सूत्राच्या अंतर्गत उपस्थित केला. इंग्रजीशिवाय इतकीच अडचण येत असेल, तर त्या आमदारांना ब्रिटनच्या संसदेत पाठवा, असे उपरोधिक वक्तव्य सुधीर मुनगंटीवार यांनी या वेळी केले.

सुधीर मुनगंटीवार म्हणाले, ''विधानसभ नियमातील प्रावधानानुसार सभागृहातील काम काज मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेत चालवता येत असले, तरी >> पान २

## केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले पंढरपूरला जाणाऱ्या भक्तांचे स्वागत


दैनिक आपला विदर्भ


**बुलढाणा/प्रतिनिधी :** आषाढी एकादशी निमित्य विठूरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरच्या दिशेने जाणाऱ्या वारकऱ्यांचं केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी खामगाव येथील रेल्वे स्थानकावर स्वागत केले आणि विठ्ठल दर्शन रेल्वे गाडीला ही हिरवी झेंडी दाखविली आहे.

दरवर्षी आषाढी एकादशी निमित्त पंढरपूरच्या विठुरायाचे दर्शन घेण्यासाठी बुलढाणा जिल्ह्यातील विठ्ठलभक्त पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ होत असतात

### विठ्ठलदर्शन रेल्वे गाडीला दाखविली हिरवी झेंडी

विठ्ठल भक्तांचा प्रवास सोईचा व्हावा या दृष्टिकोनातून केंद्र सरकारच्या मदतीने दरवर्षी खामगाव रेल्वे स्थानकातून विठ्ठल दर्शन एक्सप्रेस ही रेल्वे गाडी सोडण्यात येते. या विठ्ठलदर्शन एक्सप्रेसची पहिली फेरी आज दिनांक ३ जुलै रोजी पंढरपूरच्या दिशेने रवाना झाली विठुरायाच्या दर्शनासाठी जाणाऱ्या विठ्ठल भक्तांच्या स्वागतासाठी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव हे खामगाव





येथील रेल्वे स्थानकावर सकाळी ११ वाजता उपस्थित होते टाळ मृदंगाच्या निनादात पंढरपूरला जाणाऱ्या भक्तांचे स्वागत करून त्यांना अल्पोहारांचे आणि पाणी वाटप शिवसेनेच्या वतीने करण्यात आले त्यानंतर विठ्ठल दर्शन रेल्वे गाडीला केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी हिरवी झेंडी दाखवली हि गाडी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्त झाली आहे . यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शांताराम दाणे उपजिल्हाप्रमुख संजय अवताडे राजेश मिरगे तालुकाप्रमुख राजु बघे , रामा थारकर रामदास चौथनकर शहर प्रमुख चेतन ठोंबरे संतोष लिप्ते चेतन घिवे महिला आघाडी प्रमुख जयश्री देशमुख मयुरी शेजोळे शीतल भोळे योगिता राजपुत यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, वारकरी, आणि नागरिक उपस्थित होते

CMYK

# राज्यातील एम.फिल अर्हता धारक प्राध्यापकांचा मार्ग मोकळा: पंचवीस वर्षापासून प्रलंबित प्रश्न निकाली

## उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयांतील एम.फिल अर्हता धारक असलेल्या अनेक प्राध्यापकांचा गेली पंचवीस वर्षापासून प्रलंबित प्रश्न निकाली लागला असून दीर्घकाळ सेवेत असूनही अनेकन लाभांपासून वंचित असलेल्या १हजार ४२१ प्राध्यापकांना न्याय मिळाला आहे. अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, १९९३ पूर्वी एम.फिल अर्हता ग्राह्य मानली जात होती. त्यानंतर १४ जून २००६ ते ११ जुलै २००९ या कालावधीत थेट नियुक्त प्राध्यापकांना एम.फिल अर्हता ग्राह्य धरली गेली. मात्र १९९४ ते २००९ दरम्यान एम.फिल प्राप्त करून सेवेत असलेल्या अनेक प्राध्यापकांना या अर्हतेचा लाभ मिळालेला नव्हता. हा प्रश्न तब्बल २५ वर्षांपासून प्रलंबित होता. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान तसेच विद्यापीठ अनुदान आयोग () यांच्या समवेत चर्चा करून राज्यातील या प्राध्यापकांच्या परिस्थिती, तांत्रिक अडचणी आणि त्यांच्यावर होणारा अन्याय याबाबत वारंवार चर्चा करून काही प्राध्यापकांना आधीच लाभ मिळाल्याचे निदर्शनास आणून, देऊन एकसमानता असावी त्यासाठी एक वेळची सवलत देण्याची मागणी केंद्रीय मंत्री यांच्याकडे केली होती. या मागणीला प्रतिसाद देत विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. २ जुलै २०२५ रोजी राज्यातील १४२१ प्राध्यापकांना एम.फिल अर्हतेच्या दिनांकापासून नेट/सेटमधून सूट देण्यास मान्यता दिली आहे. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे संबंधित प्राध्यापकांना वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणीतील पदोन्नती लाभ मिळणार आहेत.दीर्घकाळ सेवेत असूनही



अनेक वर्षांपासून लांभापासून वंचित असलेल्या प्राध्यापकांना न्याय मिळाला आहे.

## सेक्सटॉर्शन : ऑनलाइन फसवणुकीचा नवा मार्ग

सध्याचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट आज जीवनावश्यक गरज बनली आहे. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वच जण इंटरनेटचा वापर करतात. इंटरनेट चे स्वरूप जसे विस्तारित गेले तसे ऑनलाइन गुन्हेगारीही विस्तारित गेली. ऑनलाइन गुन्हे रोखण्यासाठी पोलिसांची सायबर शाखा सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे असे असतानाही ऑनलाइन गुन्हे करणारे नवनवीन मार्ग शोधून सर्वसामान्यांची आर्थिक फसवणूक करत असतात. या फसवणुकीला केवळ सर्वसामान्य नागरिकच नाही तर नोकरदार, व्यावसायिक, डॉक्टर, वकील, इंजिनियर या सारखे प्रतिष्ठित नागरिक ही बळी पडतात. या सायबर गुन्हेगारांनी आता फसवणुकीचा मार्ग शोधून काढला आहे. तो आहे सेक्सटॉर्शन. अलीकडच्या काळात ऑनलाइन लैंगिक छळाचे प्रमाण वाढले आहे त्यातूनच हा शब्द निर्माण झाला आहे. अक्स्टॉर्शन म्हणजे खंडणी तसाच लैंगिक खंडणी म्हणजे सेक्सटॉर्शन. सोशल मीडियाच्या फेसबुक अकाउंटचा यासाठी वापर केला जातो. सोशल मीडियाच्या फेसबुक अकाउंटवरुन तुम्हाला एका अनोळखी मुलीची फ्रेंड रिक्वेस्ट येते. ती फ्रेंड रिक्वेस्ट माहिती न घेता स्वीकारली जाते. नंतर मेसेंजरच्या माध्यमतातून चॅटिंग केली जाते. त्यानंतर एकमेकांचे व्हाट्सएप नंबर घेऊन व्हाट्सएपवर चॅटिंग होते. चॅटिंग बरोबरच व्हिडीओ कॉल, व्हाट्सएप कॉल करण्यास सुरुवात होते. समोरची व्यक्ती अंगप्रदर्शन करून अश्लील हावभाव करते. समोरच्या व्यक्तीला मोहात अडकवले जाते. त्याला प्रोत्साहन देऊन त्याच्याकडून विवस्त्र अश्लील बाबी करून घेतल्या जातात. विशेष म्हणजे या सर्वांचे व्हिडीओ ऑन स्क्रीन रेकॉर्ड केले जाते. त्यानंतर काही दिवसांच्या फरकाने तुम्हाला मेसेज, फोन कॉल करून पैशांची मागणी केली जाते. पैसे न दिल्यास तुमचा अश्लील व्हिडीओ व्हायरल करून बदनाम करण्याची धमकी दिली जाते. अशा प्रकारे लैंगिक खंडणी सेक्सटॉर्शनची मागणी केली जाते. यात प्रामुख्याने कॉलेजमधील विद्यार्थी व समाजातील प्रतिष्ठित नागरिकांना टार्गेट केले जाते. यात फसणारे बदनामीला घाबरून या सायबर गुन्हेगारांना हवी ती रक्कम देतात. बऱ्याचदा रक्कम देऊनही पुन्हा मागणी केली जाते. त्यामुळे फसवले गेलेले मानसिक तणावात येतात त्यातून ते आत्महत्येचा मार्गही स्वीकारतात. या प्रकाराला बळी पडून काही जणांनी आत्महत्या केल्याच्या घटनाही घडल्या आहेत. सेक्सटॉर्शन हा पैसे कमावण्याचा नवा मार्ग सायबर गुन्हेगारांनी शोधून काढला आहे. या सायबर गुन्हेगारांना पकडणे सायबर पोलिसांसाठी मोठे आव्हान बनले आहे कारण हे गुन्हेगार राज्याबाहेर किंवा देशाबाहेरचेही असू शकतात. या सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात अडकू नये यासाठी सोशल मीडियाचा वापर करताना सावधगिरी बाळगायला हवी. कोणाचीही अनोळखी फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नये. आपली फ्रेंड लिस्ट आणि फॉलोअर्स वाढवण्याचा अट्टाहास आपले आर्थिक व मानसिक नुकसान करू शकतो. आजची तरुणाई सोशल मीडियाची मोठी फॅन बनली आहे. इंटरनेट, मोबाईल ही तरुणांची जीवनावश्यक गरज बनली आहे. मात्र याचा वापर समाजहिताच्या गोष्टी जोपासण्यासाठी झाला तरच उत्तम नाहीतर तुमची एक चूक तुमच्या जिवावरही बेतू शकते. म्हणूनच प्रत्येकाने सावधगिरी बाळगून सोशल मीडियाचा वापर करावा.

# लातूरच्या 'त्या' शेतकऱ्याला सोनू सूदची सर्वात मोठी मदत!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील लातूरमधील एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. एक शेतकरी आणि त्याच्या पत्नीचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. या व्हिडिओत शेतकऱ्याने बैलाऐवजी स्वत:लाच नांगराला जुंपले होते. शेतीच्या मशागतीसाठी बैल परवडत नसल्याने शेतकरी चक्क स्वत:च औत ओढत मशागत करताना दिसत आहे. झी २४ तासने ही बातमी व व्हिडिओ दाखवतच संपूर्ण महाराष्ट्राने या बातमीची दखल घेतली. कृषीमंत्र्यांनीदेखील या वृद्ध शेतकऱ्याला मदतीची घोषणा केली होती. त्यानंतर आता अभिनेता सोनू सूदने देखील मदतीची घोषणा केली आहे.

लातूरच्या अहमदपूर तालुक्यातून एक हृदयद्रावक घटनासमोर आली आहे. शेतीच्या मशागतीसाठी बैल परवडत नसल्याने एक वृद्ध शेतकरी चक्क स्वत:च औत ओढत शेतीची मशागत करताना दिसत आहे. हाडोळती येथील अल्पभूधारक शेतकरी मागच्या ५० वर्षापासून शेती करत आहे. मात्र आर्थिक परिस्थिती हालकीचे असल्याने ट्रॅक्टरने किंवा बैलाने शेती करणे अवघड झाल आहे. त्यामुळं हे पवार दाम्पत्य शेतीत कोळपणीचं काम करत आहेत.



दरम्यान या वृद्ध शेतकरी दाम्पत्याचं वय ७५ वर्ष आहे. मात्र हे दोघेही पती-पत्नी रात्रंदिवस शेतात राबत आहेत. तरी देखील शेती परवडत नाही. तर शासनाने कर्जमाफी करावी अशी देखील मागणी या शेतकऱ्यांनी केली आहे. शेतकरी दाम्पत्याचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला आहे. या व्हायरल व्हिडिओनंतर प्रशासनानेही मदतीची घोषणा केली आहे. कृषी विभागाने सवलतीच्या दरात उपकरणे पुरवण्याची आणि ओळखपत्रे बनवण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. त्यानंतर आता बॉलिवूड अभिनेता सोनू सूद यांनेही मदतीची तयारी दाखवली आहे. सूद याने ट्विट करत मदत करण्याची इच्छा असल्याचे म्हटलं आहे. 'त्यांचा नंबर द्या, मी बैलांची व्यवस्था करतो', असं ट्विट सोनू सूद याने केले आहे.

दरम्यान, सोनू सूदच्या या ट्विटवर अनेकांनी कमेंट केल्या आहेत. एकाने कमेंट करत म्हटलं आहे की बैलाच्या ऐवजी ट्रॅक्टर पाठवा. या वयात ते बैलगाडी कोण हाकणार? त्यावर सोनू सूदने उत्तर दिलं आहे की, आपल्या शेतकरी बांधवाला ट्रॅक्टर कसे चालवायचे माहिती नाही. त्यामुळं बैलच ठिक आहेत. त्याचबरोबर कृषी अधिकाऱ्यांनीही सोनू सूदचे आभार मानले असून पुढे म्हटलं आहे की, शेतकरी दाम्पत्यासाठी कृषी विभागाने एक ट्रॅक्टर आणि १.२५ लाखांच्या मदतीची घोषणा केली आहे.

# ही तर मतदान बंदी! निवडणुकीच्या तोंडावर मतदारयादीत मोठ्या प्रमाणात फेरफार; इंडिया आघाडी निवडणूक आयोगाच्या दारात

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** इंडिया आघाडीने बिहारमधील मतदार यादीच्या मोठ्या प्रमाणात केलेल्या फेरफाराला 'मतदान बंदी' म्हटले आहे. याबाबत इंडिया ब्लॉकच्या ११ पक्षांच्या शिष्टमंडळाने बुधवारी निवडणूक आयोगाची भेट घेतली. इंडिया आघाडीला निवडणूक आयोगासमोर त्यांच्या चिंता मंडायच्या होत्या, परंतु विरोधी नेते या बैठकीबद्दल समाधानी दिसत नव्हते. सीपीआय (एमएल) लिबरेशनचे सरचिटणीस दीपांकर भट्टाचार्य म्हणाले, 'निवडणूक आयोगाला भेटल्यानंतर आमच्या चिंता आणखी वाढल्या आहेत, कारण आयोगाने आमच्या कोणत्याही प्रश्नाचे समाधानकारक उत्तर दिले नाही.'

काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी एक्स पोस्टमध्ये लिहिले की, 'बिहारमध्ये सुरू असलेल्या विशेष गहन फेरफार (एसआयआर) प्रक्रियेवर इंडिया आघाडीच्या प्रतिनिधींनी निवडणूक आयोगाची भेट घेतली. आयोगाला ही बैठक सक्तीमुळे घ्यावी लागली, कारण यापूर्वी त्यांनी भेटण्यास नकार दिला होता. आयोगाने प्रत्येक पक्षाच्या फक्त दोन प्रतिनिधींना प्रवेश दिला. मलाही सुमारे दोन तास प्रतीक्षालयात बसावे लागले.' त्यांनी पुढे लिहिले की, 'गेल्या ६ महिन्यांत निवडणूक आयोगाने ज्या पद्धतीने काम केले आहे त्यामुळे आपल्या लोकशाही व्यवस्थेचा पाया कमकुवत झाला आहे. निवडणूक आयोग ही एक संवैधानिक संस्था आहे. सुनावणीची विरोधकांची मागणी ते वारंवार नाकारू शकत नाही. त्यांना संविधानातील तत्त्वे आणि तरतुदींचे पालन करावे लागेल.' ज्याप्रमाणे पंतप्रधानांच्या नोव्हेंबर २०१६ च्या 'नोटाबंदी'ने आपली अर्थव्यवस्था उद्ध्वस्त केली, त्याचप्रमाणे निवडणूक आयोगाची 'मतबंदी' - जी बिहार आणि इतर राज्यांमध्ये एध्ठ म्हणून दिसून येत आहे, ती आपली लोकशाही नष्ट करेल.

११ पक्षांचे प्रतिनिधी निवडणूक आयोगाला भेटण्यासाठी पोहोचले

इंडिया आघाडीचे शिष्टमंडळ बुधवारी निवडणूक आयोगाच्या दिल्ली कार्यालय निर्वाचन सदन येथे पोहोचले. या शिष्टमंडळात काँग्रेस, राष्ट्रीय जनता दल, सीपीआय(एम), सीपीआय, सीपीआय(एमएल) लिबरेशन, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि समाजवादी पक्षाचे नेते होते.

पान १ वरून...

## राज्यातील धरणांमधील

पातळीपर्यंत पोहोचले आहे

.सध्या नदीची पाणीपातळी २३.१० मीटरवर पोहोचलीये.

त्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आलाय .खबरदारीचा उपाय म्हणून कुंडलिका नदीवरील जुना पूल रहदारीसाठी बंद करण्यात आला आहे .

खडकवासला धरणातून विसर्ग वाढवला

पुणे घाटमाथासह शहरात तसेच धरण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्याने खडकवासला धरणातून विसर्ग वाढवण्यात आला आहे .रात्रभर झालेल्या पावसामुळे रात्री बारापासून ६४५१ क्युसेक विसर्ग करण्यात आलाय .पावसाच्या प्रमाणानुसार हा विसर्ग कमी जास्त केला जाणार असल्याची माहिती पाटबंधारे विभागाकडून देण्यात आली .

उजनीतून पाण्याचा विसर्ग बंद

आषाढी एकादशीच्या सोहळ्यासाठी येणाऱ्या लाखो भाविकांना चंद्रभागेच्या पाण्यात सुरक्षित पवित्र स्नान करता यावे यासाठी उजनी धरणातून गेल्या काही दिवसांपासून भीमा नदीत सोडण्यात येणाऱ्या पाण्याचा विसर्ग आज पूर्णपणे थांबविण्यात आला आहे . गेल्या पंधरा दिवसांपासून उजनी धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सोडण्यात येत होता .त्यामुळे चंद्रभागेची पाणी पातळी सातत्याने कमी अधिक होत होती .आता आषाढी सोहळ्याला केवळ तीन दिवस उरल्याने आजपासून उजनी धरणातला विसर्ग पूर्णपणे थांबवलाय .त्यामुळे सध्या पात्राच्या बाहेर आलेली चंद्रभागा उद्या पुन्हा पात्रात जाणार आहे . सध्या उजनी धरणात १०२ टीएमसी एवढा पाणीसाठा शिल्लक आहे .धरणात जवळपास १२,००० क्युसेक विसर्गने पाणी जमा होत आहे .

गोसेखुर्द धरणातून २५ हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग

भंडाऱ्यात गोसेखुर्द धरणाचे पाच दरवाजे अर्धा मीटरने उघडण्यात आले असून १५००० क्युसिक पाण्याचा विसर्ग वैनगंगा नदीपात्रात सुरू आहे .धरणाचे पाच दरवाजे आणि दोन्ही जलविद्युत प्रकल्पातून हा पाण्याचा विसर्ग होतोय .मागील चार दिवसात गोसेखुर्द धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाने जोरदार हजेरी लावली .परिणामी धरणाचा जलसाठा नियंत्रित ठेवण्यासाठी धरण प्रशासनानं आज सकाळी ११:०० वाजल्यापासून हा विसर्ग सुरू केला .नदीपात्रातून आवागमन करणाऱ्यांनी स्वतःची काळजी घ्यावी असा आवाहन गोसेखुर्द धरण प्रशासनाने केला आहे .दुपारी २ वाजता गोसेखुर्द धरणाचे आणखी चार दरवाजे उघडून पाण्याचा विसर्ग वाढविण्यात आला आहे .आता एकूण नऊ दरवाजातून ४०,८९८ क्युसिक पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे .

कोयना धरणातून विसर्ग वाढणार

उत्तर महाराष्ट्रातही गेल्या काही दिवसांपासून पावसाची हजेरी कायम असल्याने कोयना धरणातून विसर्ग वाढविण्याचा निर्णय घेण्यात आलाय .धरणात ५६ टीएमसी पाणीसाठा आहे .महाबळेश्र्वरच्या पावसानेही दीड हजार मिलिमीटरचा टप्पा ओलांडला . बहुतांश मोठे प्रकल्प ५० ते ७५% पर्यंत भरले आहेत .त्यामुळे धरणातून विसर्ग वाढविण्यात येणार आहे . कोयना धरण क्षेत्रात झालेल्या पावसामुळे आज सकाळच्या सुमारास धरणात २८ हजार क्यूस एक वेगाने पाणी येत होते .गेल्या २४ तासात कोयना धरणात अडीच टीएमसी पाणीसाठा वाढलाय.

## वारीमध्ये अर्बन नक्षलवादी

दुसरीकडे कार्यक्रम असल्याची माहिती शरद पवार यांनी दिली.

एक रस्ता असताना दुसरा कशाला?

पुणे रेल्वे स्टेशनच्या नामांतराच्या मुद्यावर देखील शरद पवार यांनी प्रतिक्रिया दिली. काही लोक मला भेटले होते. महत्मा फुले, छत्रपती संभाजीराजे यांची नावं त्यांनी सुचवल्याचे शरद पवार म्हणाले. शक्तीपीठ महामार्गाबाबत देखील शरद पवारांनी प्रतिक्रिया दिली. बेळगावला जायला चांगला रस्ता आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी चांगले रस्ते तयार केले आहेत. मध्ये मध्ये कामामुळे काही ठिकाणी डायव्हर्जन आहे. परंतू, सध्याचा रस्ता उत्तम आहे, असं असताना दुसरा रस्ता कशाला हवा? असा सवाल शरद पवारांनी केला. मुख्यमंत्री म्हणतायेत या रस्त्याची गरज आहे. एक रस्ता असताना दुसरा कशाला? आम्ही त्यांच्याकडून समजून घेऊ असे शरद पवार म्हणाले. केवळ रस्ता होत नसतो तर त्यात अनेकांच्या जमीन जात असतात. आम्ही मुख्यमंत्र्यांकडून समजून घेऊ की दुसरा रस्ता का गरजेचा आहे असे शरद पवार म्हणाले.

## विठुरायाची भेट अपूर्णच

महिलां हळहळ व्यक्त करत आहेत. विठुरायाच्या भेटीची आस घेऊन पंढरपूरकडे वाटचाल करणाऱ्या उषाताईंना पंढरीच्या विठोबाचे केवळ काही अंतरच उरले होते.

पंढरीच्या वाटेवरच महिलेनं जीव सोडल्यामुळे इतर वारकऱ्यांमध्येही हळहळ व्यक्त होत असून सुरक्षिततेच्या उपाययोजनांवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विठ्ठलाच्या भेटीसाठी पंढरपूरला पायी जाणारे हजारो वारकरी शेकडो मैल अंतर कापत पंढरपुरात येतात . २५० किमीच्या प्रवासात काट्या कुट्यातून,चिखलातून माऊलीचा गजर करत पंढरीच्या वारीला निघतात. यंदा महाराष्ट्र सरकारने वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून वारीदरम्यान कोणत्याही प्रकारच्या अपघातात वारकऱ्यांचा मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबीयांना सरकारकडून चार लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाणार आहे .यासंदर्भातलं नवं परिपत्रक महसूल विभागाने आज जाहीर केला आहे . १६ जून ते १० जुलै २०२५ या कालावधीत वारीदरम्यान जर एखाद्या वारकऱ्याचा अपघात, विषबाधा किंवा इतर नैसर्गिक कारणामुळे मृत्यू झाला, तर त्यांच्या कुटुंबीयांना ही रक्कम मिळणार आहे.

आरोग्य तपासणी

गतवर्षीप्रमाणे याहीवर्षी आषाढी वारीनिमित्त राज्याच्या आरोग्य विभागाकडून भव्य आरोग्य शिबिरे आयोजित केली जातील, वारकऱ्यांसाठी कार्डीएक रुग्णवाहिकेची सोय उपलब्ध करून दिली जाईल, पंढरपुरात तात्पुरती आयसीयू सुविधा उपलब्ध करून दिली जाईल, या सर्व सोयी उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांनी स्वतः पंढरपूरला जाऊन आढावा घ्यावा असे निर्देश शिंदे यांनी यावेळी त्याना दिले. तसेच प्रत्येक जिल्ह्यातून निघणाऱ्या मोठ्या दिंड्यांना वारीच्या काळात पूर्णवेळ सुसज्ज रुग्णवाहिका उपलब्ध करून द्यावी असेही उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## हिंदीला विरोध आणि इंग्रजीला

अद्यापपर्यंत सभागृहात इंग्रजीतील कामकाजपत्रिका मी पाहिलेली नाही. एकिकडे मराठीला अभिजात भाषा करायची आणि ज्यांना मराठी बोलता येत नाही त्यांना हिंदीची संधी असतांना इंग्रजीतून कामकाजपत्रिका कशासाठी? मराठी समजायला अडचण असेल, तर कामकाजपत्रिका हिंदीतून काढावी. हिंदीला विरोध आणि इंग्रजीला आलिंगन, हे धोरण चुकीचे आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून आषाढी वारीसाठी प्रशासनाने केलेल्या सुविधांची पाहणी

दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी :** आषाढी वारी २०२५ च्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने पंढरपूर शहर, मंदिर परिसर, दर्शन रांग (पत्रा शेड), भक्ती सागर(६५ एकर) या ठिकाणी वारकरी, भावीकांसाठी प्रशासनाने उपलब्ध करून देण्यात आलेल्या सोयी सुविधांची पाहणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. व या कालावधीत सर्व पालखी सोहळ्या समवेत येणारे वारकरी, भाविकांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही याबाबत केलेल्या नियोजनाची कार्यक्षमपणे अंमलबजावणी करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, आमदार समाधान आवताडे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, मंदिर समितीचे कार्य





अधिकारी राजेंद्र शेळके, प्रांताधिकारी सचिन इथापे, मुख्याधिकारी महेश रोकडे आदी मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भक्ती सागर (६५ एकर) येथे प्रशासनाने वारकरी, भाविक यांच्यासाठी उपलब्ध केलेल्या सोयी सुविधांची पाहणी करण्यासाठी बुलेट वरून आले. येथील आपत्कालीन दक्षता व प्रतिसाद केंद्राला भेट देऊन तेथे आयसीयू मध्ये असलेल्या रुग्णांशी संवाद साधून त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. तसेच आरोग्य सेवा व्यवस्थित मिळत आहे का याचीही त्यांनी खात्री केली. पोलीस विभागाने वारी कालावधीत ड्रोनद्वारे गर्दी व वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी नव्याने खरेदी केलेल्या ड्रोनची पाहणी करून उद्घाटनही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केले. तसेच या ठिकाणी भाविकांसाठी उपलब्ध केलेली शौचालये, हिरकणी कक्ष, पाणीपुरवठा व्यवस्थाची ही पाहणी त्यांनी केली. त्यानंतर वाळवंटात प्रशासनाने उपलब्ध केलेल्या सुविधांची पाहणी केली व उजनी धरणातून भीमा नदी पात्रात येणारा पाण्याचा प्रवाह नियंत्रित ठेवून वाळवंट वारकरी, भाविक यांच्यासाठी उपलब्ध राहील, याबाबत नियोजन करण्याचे त्यांनी सुचित केले. तसेच नदीपात्रात कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडणार नाही या अनुषंगाने काळजी घेण्याबाबत उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी निर्देशित केले. तसेच पत्राशेड येथे असलेल्या दर्शन रांगेची पाहणी ही त्यांनी केली. तसेच दर्शन रांगेतील भाविकांशी संवाद साधून दर्शन रांगेत उपलब्ध करून देण्यात आलेल्या सुविधा विषयी माहिती, त्यांनी घेतली.

प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आषाढी वारी २०२५ मध्ये जिल्हा प्रशासनाच्या वतीने पालखी मार्ग, पंढरपूर शहर, भक्ती सागर, पत्रा



शेड, वाखरी तळ येथे उपलब्ध करून देण्यात आलेल्या सोयी सुविधांची सविस्तर माहिती दिली. तर पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी संपूर्ण यात्रा कालावधीत पोलीस प्रशासनाच्या वतीने कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी केलेल्या नियोजनाची सविस्तर माहिती दिली.

## संक्षिप्त...

### कृषिमित्रांनी दिले शेतकऱ्यांना उद्यानविधेचे धडे



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,अकोला संलग्नित डॉ राजेंद्र गोडे कृषि महाविद्यालय बुलडाणा ग्रामीण कृषि कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत दहीद बु. येथे आंबा कलम लागवडीचे प्रात्यक्षिक गावकऱ्यांच्या समक्ष दाखवले आणि त्यांना कलम लागवडीचे फायदे व महत्व पटवून दिले.डॉ राजेंद्र गोडे कृषी महाविद्यालयाच्या चतुर्थ वर्ष सातव्या सत्रातील विद्यार्थ्यांनी केसर आंबा कलम लागवडीचे प्रात्यक्षिक बालाजी ठोंबरे यांनी शेतकऱ्यांच्या समक्ष सादर केले तथा या बद्दलचे फायदे व महत्व शिवम तारापूरे यांनी शेतकऱ्यांना सांगितले या संपूर्ण कार्यक्रमाला उद्यानविद्या विभागचे मार्गदर्शन आणि साथ लाभली तसेच गावातील नागरिकांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाला उपस्थित माजी प्रा. अवचित राऊत सर, युवा शेतकरी पवन गायकवाड, प्रगतशील शेतकरी रवींद्र गायकवाड, राजेंद्र गायकवाड, चरणसिंग राजपूत, सचिन राजपूत, विनोद राजपूत आणि गावातील सर्व शेतकरी वर्ग उपस्थित होते तसेच या कार्यक्रमाला कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.यु. वाघ, विषय तज्ञ प्रा.आर.एम.काटे आणि प्रा.आई.डी.किंगे, कार्यक्रम अधिकारी श्री एस. एस. सराप सर यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमामध्ये शिवम तारापूरे,गणेश वानखेडे, आदित्य वडजे, बालाजी ठोंबरे, मयूर तायडे इ.कृषीविद्यार्थी यांचा समावेश होता.

### पाकिस्तानी सेलिब्रेटींच्या इन्स्टा अकाउंटवर भारतात बंदी

नवी दिल्ली : पाकिस्तानी सेलिब्रेटींच्या इन्स्टा अकाउंटवर भारतात बंदी लागू करण्यात आली आहे. भारत सरकारने निर्देश दिल्यानंतर इन्स्टाग्रामने पाकिस्तानी सेलिब्रेटींच्या इन्स्टा अकाउंट भारतात दिसणार नाही, अशी व्यवस्था केली आहे. फवाद खान, माहिरा खान, मावरा होकेन, हानिया आमिर अशा एकूण २४ पाकिस्तानी सेलिब्रेटींची इन्स्टा अकाउंट भारतात ब्लॉक करण्यात आली आहेत.

पाकिस्तान पुरस्कृत अतिरेक्यांनी २२ एप्रिल २०२५ रोजी भारतात पहलगाम येथे अतिरेकी हल्ला केला होता. या घटनेनंतर भारत – पाकिस्तान दरम्यान तणाव निर्माण झाला. भारत सरकारने पाकिस्तानमधून हाताळली जाणारी तसेच पाकिस्तानच्या नागरिकांची अशी अनेक सोशल मीडिया अकाउंट, यू ट्युब चॅनल ब्लॉक करण्याचा निर्णय घेतला. ऑपरेशन सिंदूरनंतर भारत सरकारने बंदी घातलेल्या पाकिस्तानी कलाकारांच्या सोशल मीडिया अकाउंट्सच्या संख्येत वाढ झाली. पण मागील काही तासांपासून निवडक पाकिस्तानी सेलिब्रेटींची इन्स्टा अकाउंट भारतात दिसण्यास सुरुवात झाली होती. हा प्रकार लक्षात येताच तातडीने कारवाई करुन भारत सरकारने २४ पाकिस्तानी सेलिब्रेटींची इन्स्टा अकाउंट भारतात पुन्हा ब्लॉक केली.

देशाच्या सुरक्षिततेसाठी तसेच अपप्रचाराला खीळ घालण्यासाठी भारताने पाकिस्तानी सेलिब्रेटींच्या सोशल मीडिया अकाउंट्सवर देशात बंदी घातली आहे. सरदारजी ३ या सिनेमात एका पाकिस्तानी अभिनेत्रीने काम केले आहे. त्यामुळे हा सिनेमा प्रदर्शित करण्यास भारत सरकारने परवानगी नाकारली आहे.

### इंग्लंडच्या कॅप्टनच अर्धशतक फुकट गेलं, वैभव सूर्यवंशीने ३१ बॉलमध्ये उडवली झोप; मालिकेत टीम इंडियाची आघाडी

**मुंबई/प्रतिनिधी :** भारताने १९ वर्षांखालील युवा एकदिवसीय सामन्यात इंग्लंडचा पराभव केला आणि पाच सामन्यांच्या मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली. बुधवारी पावसामुळे प्रभावित झालेल्या तिसऱ्या सामन्यात भारताच्या १९ वर्षांखालील संघाने इंग्लंडच्या १९ वर्षांखालील संघाचा चार विकेट्सने पराभव केला. इंग्लंडने प्रथम फलंदाजी करताना ६ विकेट्स गमावत २६८ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल, वैभव सूर्यवंशीच्या झंझावाती खेळीमुळे भारताने ३४.४ षटकांत ६ विकेट्स गमावत २७४ धावा करून सामना जिंकला. पावसामुळे हा सामना ४०-४० षटकांचा खेळवण्यात आला. इंग्लंडने प्रथम फलंदाजी केली आणि चांगली सुरुवात केली. संघाची पहिली विकेट ७८ धावांवर इसहाक मोहम्मदच्या रूपात पडली. तो ४१ धावा करून बाद झाला. बीजे डॉकिन्सने ६२ धावांची खेळी केली. त्यानंतर भारताने दोन विकेट लवकर गमावल्या.बेन मेयर ३१ धावा काढून बाद झाला आणि रॉकी फ्लिंटॉफ फक्त १६ धावा काढून बाद झाला. कर्णधार थॉमस रियू पुन्हा एकदा संघासाठी उपयुक्त खेळी केली. थॉमसने ४४ चेंडूत ७६ धावा केल्या, ज्यात ९ चौकार आणि ३ षटकारांचा सम ावेश होता. या खेळीमुळे इंग्लंड २५० धावांचा टप्पा ओलांडू शकला.

## बॉलिवूड स्टार मंदाकिनीच्या वडिलांचं झालं निधन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूडमधील ज्येष्ठ अभिनेत्री मंदाकिनीचे वडील जोसेफ यांचं निधन झालं आहे. आता निधनाची माहिती अभिनेत्रीनं स्वत:च्या सोशल मीडिया प्लॅटफफॉर्मवर शेअर केली आहे. तिच्या अधिकृत इंस्टाग्राम हँडलवर दिवंगत वडिलांचा फोटो पोस्ट करताना तिनं लिहिलं, ''आज माझे मन तुटले आहे... मी आज सकाळी माझे प्रिय वडील गमावले. या निरोपाच्या वेदना शब्दात वर्णन करता येत नाहीत. बाबा, तुमच्या अमर्याद प्रेम, ज्ञान आणि आशीर्वादांसाठी धन्यवाद. तुम्ही नेहमीच माझ्या हृदयात राहाल.' दरम्यान मंदाकिनीचे लग्न बौद्ध भिक्षू डॉ. काग्युर टी. रिनपोचे ठाकुर यांच्याशी झाले आहे, जे तिबेटी हर्बल सेंटर चालवतात. या जोडप्याला दोन मुले आहेत, रबिल नावाचा मुलगा आणि रब्झे इन्ना नावाची मुलगी. दरम्यान दलाई लामाची अनुयायी झाल्यानंतर, मंदाकिनी आता तिबेटीमध्ये योग वर्ग चालवते.

१९९०च्या दशकाच्या सुरुवातीला, अभिनेत्री गँगस्टर दाऊद इब्राहिमबरोबर तिच्या कथित संबंधांमुळं चर्चेत होती. मात्र तिनं नेहमीच दाऊदबरोबर प्रेमसंबंध असल्याचे नाकारले. मात्र कुख्यात गँगस्टर दाऊदबरोबरच्या नात्यामुळं तिच्या चित्रपट कारकिर्दीवर आणि सार्वजनिक प्रतिमेवर परिणाम झाला होता. मंदाकिनीला बॉलिवूड अभिनेता आणि दिग्दर्शक राज कपूर यांच्या १९८५ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'राम तेरी गंगा मैली' या चित्रपटातील भूमिकेमुळं प्रसिद्धी मिळाली. या चित्रपटात राजीव कपूर यांच्याबरोबर तिनं स्क्रीन शेअर केली होती. मंदाकिनी हिंदी चित्रपटसृष्टीतील आघाडीची अभिनेत्री होती. तिनं अनेक लोकप्रिय चित्रपटामध्ये काम केलं आहे. यामध्ये 'डान्स डान्स', 'कहां है कानून', 'प्यार करके देखो', 'बाज', 'शेषनाग', 'लोहान', आणि 'तकदीर का तमाशा' या चित्रपटांचा समावेश आहेत.

## आषाढी वारीच्या पार्श्वभुमीवर उत्पादन शुल्क विभागाची धडक कारवाई: १४ लाख ५० हजारांहून अधिक मुद्देमाल जप्त!

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** पंढरपूरची आषाढी वारी काही दिवसांवर आली असताना, राज्य उत्पादन शुल्क विभागाने सोलापूर जिल्ह्यात अवैध दारूविक्री आणि निर्मितीवर जोरदार कारवाईचा बडगा उगारला आहे. या धडक म ोहिमेत तब्बल १४ लाख ४५ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. वारकरी सांप्रदायाची शिस्त आणि पावित्र्य राखण्यासाठी ही कारवाई अत्यंत महत्त्वाची ठरत आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील पथकांनी अवैध हातभट्टी निर्मिती केंद्रे, अवैध देशी-विदेशी मद्य विक्री, वाहतूक आणि बेकायदेशीर धाब्यांवर लक्ष केंद्रित केले होते. विभागीय उपायुक्त सागर धोमकर आणि अधीक्षक भाग्यश्री जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ही म ोहीम राबवण्यात आली.

या कारवाईत एकूण १५ गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. यात ९५५० लिटर रसायन, २३५ लिटर हातभट्टी दारू, १९४.२२ लिटर देशी मद्य, ३०.२४ लिटर विदेशी मद्य, ७८ लिटर बिअर आणि एक चारचाकी वाहनाचा समावेश आहे. या सर्व जप्त केलेल्या मुद्देमालाची किंमत १४ लाख ४५ हजार ४०० रुपये इतकी आहे.

गेल्या एका महिन्यात २२९ गुन्हे दाखल!

केवळ आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवरच नाही, तर १ जून ते ३० जून २०२५ या कालावधीतही सोलापूर शहर आणि जिल्ह्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाने सातत्याने कारवाई केली आहे. या एका महिन्यात एकूण २२९ गुन्हे नोंदवून २१४ जणांवर कारवाई करण्यात आली आहे.

या मोठ्या मोहिमेत ६५,५५० लिटर रसायन, ५७९३ लिटर हातभट्टी दारू, ४९९ लिटर देशी मद्य, १२८ लिटर विदेशी मद्य, १०२.३२ लिटर बिअर, २४६७ लिटर ताडी, १२६० लिटर गोव्यातील बनावट विदेशी मद्य आणि २७ वाहने जप्त करण्यात आली आहेत. या सर्व जप्त केलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत १ कोटी ३ लाख ३७ हजार २३८ रुपये इतकी आहे.

याशिवाय, अवैध मद्यविक्री आणि मद्य पिण्यास परवानगी देणाऱ्या २७ धाब्यांवरही गुन्हे नोंदवून कारवाई करण्यात आली आहे.

अवैध मद्यविक्री, निर्मिती आणि वाहतुकीविरोधातील ही कारवाई यापुढेही सुरूच राहणार असल्याची माहिती अधीक्षक भाग्यश्री जाधव यांनी दिली आहे. तुम्हाला कुठेही अवैध मद्याची माहिती मिळाल्यास, टोल फ्री क्रमांक १८००२३३९९९९ किंवा व्हॉट्सॲप क्रमांक ८४२२००११३३ वर संपर्क साधून माहिती देऊ शकता. माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवले जाईल, असेही विभागाने स्पष्ट केले आहे.

## सुलतानपूरच्या चार खेळाडूंचा नेपाळमध्ये डंका

### २ सिल्व्हर व २ ब्राँझ पदकांची कमाई

दैनिक आपला विदर्भ

**सुलतानपूर/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील सुलतानपूर (ता. लोणार) या छोट्याशा गावाने पुन्हा एकदा आपल्या क्रीडाप्रतिभेचा झेंडा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर रोवला आहे. गावातील चार युवकांनी नेपाळमधील पोखरा येथे नुकत्याच पार पडलेल्या बुद्धनाक आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारतासाठी २ रौप्य (सिल्व्हर) द्वितीय क्रमांक व २ कांस्य (ब्राँझ) तृतीय क्रमांक पदकांची कमाई केली आहे.

नेपाळमधील पोखरा शहरात २२ व २३ जून २०२५ रोजी भारतीय शांती खेल महासंघ आणि स्पोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने बुद्धनाक आंतरराष्ट्रीय स्पर्धा पार पडली. भारताकडून एकूण १५ खेळाडूंनी सहभाग घेतला होता, त्यात सुलतानपूरच्या चार खेळाडूंनी ठळक कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधले. यामध्ये सुलतानपूर येथील जुनैदने व्हॉलीबॉल क्रीडा खेळात सिल्व्हर पदक प्राप्त करून द्वितीय क्रमांक पटकाविला आहे. ताबिशने व्हॉलीबॉल क्रीडा खेळात सिल्व्हर पदक पटकावून




द्वितीय क्रमांक मिळविला आहे. शाहरुख खानने शॉटपुट क्रीडा खेळात ब्राँझ पदक पटकावून तृतीय क्रमांक मिळविला आहे.अब्दुल फैसलने शॉटपुट क्रीडा खेळात ब्राँझ पदक पटकावून तृतीय क्रमांक मिळविला आहे.या यशापूर्वी, १० ते १२ मे २०२५ दरम्यान हरिद्वार (उत्तराखंड) येथे झालेल्या ८ व्या ओपन नॅशनल चॅम्पियनशिपमध्ये याच चौघांनी चार सुवर्ण पदकांची कमाई केली होती. या राष्ट्रीय कामगिरीच्या जोरावरच त्यांची पोखरा आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली होती. सुलतानपूरसारख्या ग्रामीण भागातील युवक आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवत असल्याने गावासह संपूर्ण महाराष्ट्रासाठी हा गौरवाची बाब आहे.

## रिंकू राजगुरु २० वर्षांनी वारीला निघाली, तल्लीन होऊन भक्तीरसात रमली

दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी :** अभिनेत्री रिंकू राजगुरु तिच्या अभिनयामुळे किंवा प्रोजेक्ट्समुळे चर्चेत असते. शिवाय ती सोशल मीडियावर आपल्या चाहत्यांसाठी काहीना काही शेअर करताना देखील पाहायला मिळते. मात्र, आता रिंकू राजगुरु वारीत सहभागी झाली असून विठू नामाच्या गजरात तल्लीन झाली आहे. रिंकू राजगुरु हिने सोशल मीडियावर वारीचा एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये ती फुगडी खेळताना, वारकऱ्यांसोबत चालताना, तसेच कपाळावर नाम लावताना पाहायला मिळाली आहे. मात्र, तिने हा व्हिडीओ शेअर करताना इंग्रजीमध्ये एक खास पोस्ट लिहिली आहे. तिने तब्बल २० वर्षांनंतर वारीचा अनुभव घेतलाय.

दरम्यान, रिंकू राजगुरु हिने वारीचा व्हिडीओ शेअर करताना खास कॅप्शन देखील लिहिलं आहे. रिंकू राजगुरु लिहिते, जय जय राम कृष्ण हरी।।..हा प्रवास माझ्यासाठी खूप खास आहे. कारण मी ४ वर्षांची असताना माझ्या वडिलांसोबत वारीला गेले होते. आता २० वर्षांनंतर आज मी पुन्हा त्यांच्यासोबत तेच क्षण अनुभवत आहे.

'सैराट' चित्रपट २०१६ मध्ये प्रदर्शित झाला आणि क्षणार्धात प्रचंड गाजला. ग्रामीण पार्श्वभूमीवर आधारित प्रेमकथा, सामाजिक विषमता, जातीचा भेद यावर भाष्य करणाऱ्या या चित्रपटात रिंकूची भूमिका अत्यंत ताकदीची होती. तिच्या अभिनयासाठी तिला राष्ट्रीय पुरस्काराने गौरवण्यात आले. हे तिच्या कारकीर्दीतील मोठे यश ठरले. 'सैराट'च्या प्रचंड यशानंतर रिंकू राजगुरुला अनेक मराठी तसेच हिंदी प्रोजेक्ट्ससाठी ऑफर्स मिळू लागल्या. पण तिने शिक्षणालाही महत्त्व दिले. अभिनयासोबतच तिने अभ्यास सुरू ठेवला, ही गोष्ट तिच्या व्यक्तिमत्त्वातील शिस्त आणि प्रगल्भतेचे द्योतक आहे.

यानंतर रिंकूने 'कागर' या चित्रपटात काम केले. या चित्रपटातही





तिने राजकीय पार्श्वभूमीवर आधारित एक भावनिक आणि संघर्षमय भूमिका साकारली. जरी 'सैराट'सारखा मोठा गवगवा या चित्रपटाला मिळाला नाही, तरी रिंकूच्या अभिनयाचे सर्वत्र कौतुक झाले. तिच्या भूमिकेत असलेली ठाम भूमिका आणि राजकीय संवेदनशीलता प्रेक्षकांना भावली.

# मुलांना त्यांच्या आवडीनुसार स्वप्न निवडू द्या! - भार्गव राजे

## डॉ कलाम फोरम कडून गुणवंत विद्यार्थी सत्कार व करिअर मार्गदर्शन सोहळा संपन्न







दैनिक आपला विदर्भ

■ अयाज काजी

**दिग्रस :** प्रतिनिधी अयाज काजी डॉ एपीजे अब्दुल कलाम फोरम यांच्यावतीने विद्यानिकेतन इंग्लिश मिडीयम स्कूल, दिग्रस येथे गुणवंत विद्यार्थी गौरव व करिअर मार्गदर्शन कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमात दहावी, बारावी, नीट, क्रीडा तसेच विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या ५१ विद्यार्थ्यांचा, शिक्षकांचा आणि नागरिकांचा सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. भार्गव करिअर अकादमी नांदेडचे संचालक भार्गव राजे, ठाणेदार वैजनाथ मुंडे, गटशिक्षणाधिकारी मुकेश कोंडावार, सेवानिवृत्त मुख्याध्यापक हाजी मुश्ताक शेख, समाजसेविका उज्वला मानकर, वहिद भाई, डॉ कलाम फोरमचे संस्थापक मिर्झा अफजल बेग आणि अध्यक्ष फिरोज खान मंचावर उपस्थित होते.

मुख्य वक्ते भार्गव राजे यांनी विद्यार्थ्यांशी आणि पालकांशी संवाद साधत करिअर निवडीबाबत मार्गदर्शन केले. ‘‘डॉक्टर आणि इंजिनीयर यांच्यापलीकडेही अनेक करिअरच्या संधी आहेत. मुलांच्या आवडीनिवडीनुसार त्यांच्या कलाचे पालन करत त्यांना स्वप्न निवडू द्या,‘‘ असे आवाहन त्यांनी केले. मोबाईलच्या अतिवापरावर भाष्य करत ते म्हणाले, ‘‘आज मोबाईल आपल्याला वापरतो आहे, आपण मोबाईलला वापरायला शिकलं पाहिजे.‘‘ शिरीन मेमोरियल फाऊंडेशनचे संस्थापक हाजी मुश्ताक शेख, ठाणेदार वैजनाथ मुंडे आणि गटशिक्षणाधिकारी मुकेश कोंडावार यांनीही उपस्थित विद्यार्थ्यांना प्रेरणादायी संदेश देत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या सत्कारसोहळ्याचे संचलन आमीन चौहान यांनी तर आभार मिर्जा नासिर बेग यांनी मानले. प्रास्ताविक हाजी अफजल बेग यांनी केले. आतीक मौलाना महाराष्ट्रवाले, शेतकरी मित्र संतोष चव्हाण, ॲड. अमोल साळुंखे, नगर परिषद माजी सभापती सैय्यद अक्रम, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख किरण बारशे, मजहर अहेमद खान, बशीर शेख, बंडू खडसे, अलीमोहंमद भाटी, डॉ दीपक नगरभाडीया, डॉ भारत दुधे, रमेश कोपणर, उल्हास सावळे यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे संगीत शिक्षक मोरेकर, गजानन पाटील आणि डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम फोरमचे मिर्जा नासिर बेग, फारुक अहेमद, आसिफ शेख, अमीन नौरंगाबादे, मोहम्मद परसुवाले, फारुक चव्हाण, सादिक गारवे, असिफोद्दीन काजी, फैयाज शेख, जुनेद शेख, शारिक शेख व इतर सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. या कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### हे ठरले सत्काराचे मानकरी

सांख्यिकी हॉकेथॉन मध्ये देशातून तिसरा आलेला आयान शेख बशीर, ज्युडो खेळाडू आयेशा फैजान शेख, नीट उत्तीर्ण रहेबर अजगर भाटी, विश्वदीप सावळे, जैद परसुवाले, प्रतिक कोपनर, आदित्य नगरभाडिया, चैतन्य दुधे, दहावीतील सिटी टॉपर प्रथमेश साहेबराव इंगोले, संचिता राजेश राठोड, अस्मिता कमर मो. मुस्तकिम, कार्तिक संतोष चव्हाण, कबड्डी कोच सादिक गारवे, ॲथलेटिक्स कोच आसिफ काझी, नगर परिषद अभ्यासिका व्यवस्थापक मोहम्मद याकुब, व्हिडिओ निर्मिती बक्षीस पात्र शिक्षक नासिर मिर्जा, जुनेद शेख, अमीन नवरंगाबादे व फारुक मलिक यांचा विशेष सन्मान यावेळी करण्यात आला.

## विविध वृत्त...

### शिक्षक आमदार किरण सरनाईक यांनी १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णय केला लक्षवेधी




दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** आमदार किरण सरनाईक यांनी पावसाळी अधिवेशनात १४ ऑक्टोंबर २०२४ च्या वेतना बाबतच्या शासन निर्णयाची तत्काळ अंमलबजावणी करा असा जाब अर्थसंकल्पीय अधिवेशनात विचारला होता आज सुद्धा पावसाळी अधिवेशनात या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्याकरिता लक्षवेधी करून हा मुद्दा उपस्थित करून चांगलाच उचलून धरला.

अमरावती विभागाचे शिक्षक आमदार किरणराव सरनाईक यांनी मागील त्यांच्या पाच वर्षापासून विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी सतत पाठपुरावा केलेला आहे.

अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये लक्षवेधी सादर करून शासनाला जाब विचारला होता व आज सुद्धा पावसाळी अधिवेशनात हा मुद्दा पुन्हा लक्षवेधी उपस्थित करून शासनाने विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भावनांशी खेळू नये असे मत व्यक्त करत हा मुद्दा पुन्हा उपस्थित केला आहे.

या प्रश्नाला उत्तर देताना पंकज भोयर यांनी आपल्या गुळमुळीत भाषेचा पाढा वाचत शासन प्रयत्नशील आहे असे सांगितले.त्यावर किरण सरनाईक यांनी सभागृहामध्ये उपस्थित उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून उत्तर हवे असल्याचे सांगितले. त्यावर एकनाथ शिंदे यांनी लवकरच देवेंद्र फडणवीस अजितदादा पवार व स्वतः ते यावर चर्चा करून काहीतरी तोडगा काढु असे आश्वासन दिले आहे. त्यामध्ये अनुदानासाठी काही टप्पे पाडता येतील का? किंवा कशाप्रकारे निधी उपलब्ध करता येईल? त्यासाठी ठोस पावले उचलले जातील असे सांगितले आहे.

### सोलापूरात नवविवाहितेसोबत घडलं भयंकर, अंघोळीच्या बाथरुममध्ये गेली अनब तडफडून मृत्यू

**सोलापूर/प्रतिनिधी :** सोलापूरच्या माढ्या तालुक्यात एक ह्रदय पिळवटून टाकणारी घटना घडली आहे. इथं एका नवविवाहित तरुणीचा दुर्दैवी अंत झाला आहे. संबंधित विवाहित तरुणी अंघोळीच्या बाथरुममध्ये गेली होती. यावेळी घडलेल्या एका अनर्थामुळे तिचा जागीच तडफफडून मृत्यू झाला. या घटनेची माहिती माढा पोलिसांना दिली आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत. एका नवविवाहित तरुणीचा अशाप्रकारे मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. साक्षी रणवीर चांगभले असं मृत पावलेल्या २२ वर्षीय नवविवाहित तरुणीचं नाव आहे. काही दिवसांपूर्वीच त्यांचं माढ्यातील एका तरुणासोबत लग्न झालं होतं. लग्नानंतर सर्वकाही सुरळीत सुरू होतं. पण गुरुवारची सकाळ साक्षीसाठी जीवघेणी ठरली आहे. घटनेच्या वेळी ती अंघोळीच्या बाथरुममध्ये गेली होती. तिथे हिटर लावून पाणी गरम करायला लावला होता. यावेळी हिटरला धक्का लागल्याने विवाहितेला विजेचा जोरदार धक्का बसला, त्या बाथरुममध्येच खाली कोसळल्या.

## खेळणी व व्यायामासाठी लावलेली साधने हटविण्याची मागणी

दैनिक आपला विदर्भ



**रिसोड/प्रतिनिधी :** लहान मुलांची खेळणी व युवकांना व महिलांसाठी लावण्यात आलेले व्यायामासाठी साधने ही अत्यंत चुकीच्या ठिकाणी व धोकादायक ठिकाणी लावण्यात आलेली आहे. कारण ही सर्व साधने महावितरणच्या विद्युत डीपीच्या जवळ लावण्यात आलेल्या जी अत्यंत धोक्यात आहे व या ठिकाणी जीवित्वास धोका निर्माण होऊ शकतो.

सदर ठिकाणी लावण्यात आलेली सर्व सामग्री हटविण्यात यावी अशी मागणी पंकज सुधाकर पोहरकर यांनी नगरपरिषद मुख्याधिकारी सतीश शेवदा यांना दिनांक २ जुलै रोजी दिलेल्या निवेदनात केली आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, शिवाजी नगर वार्डामध्ये सार्वजनिक जागेवर खुल्या जागेत लहान मुलांना खेळण्यासाठी सामग्री लावण्यात आली आहे व जिथे सामग्री लावण्यात आली आहे. तेथे विद्युत महावितरण ची डि.पी. तेथेच असुन सर्व डी. पी. उघडी आहे. त्यामुळे लहान बालक खेळतांनी केव्हाही त्या डी.पी. ला स्पर्श करु शकतात. ज्यामुळे त्यांच्या जिवीत्वास धोका निर्माण झाला आहे.

आपण कोणतीही शहनिशा न करता परवानगी दिली आहे. तरी लहान मुलांसोबत काही अनुचीत प्रकार घडल्यास यांचा जबाबदार कोण असा प्रश्न निर्माण झाला आहे.तरी आपण काही अनुचीत प्रकार घडण्याअगोदर परवानगी रद्द करावी व सामग्री तेथुन हटविण्यात यावी. अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे अन्यथा आम्हाला नाईलाजास्तव आपल्या कार्यालयासमोर आंदोलन करावे लागेल. असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.

### मुलाचं आईसोबत सैतानी कृत्य, लोखंडी पाईप डोक्यात घालून घेतला जीव

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्याच्या धारूर तालुक्यात मन हेलावणारी घटना घडली आहे. इथं एका तरुणाने आईसोबत क्रूरतेचा कळस गाठला आहे. नराधमाने लोखंडी पाईपने मारहाण करत जन्मदातीला संपवलं आहे. आरोपी एवढ्यावरच थांबला नाही, तर त्याने आपल्या भावजयीला देखील जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करत आरोपीला अटक केली आहे.

दत्ता बांगर असं आरोपी मुलाचं नाव आहे. तर सुवर्णमाला बांगर असं हत्या झालेल्या आईचं नाव आहे. घटनेच्या दिवशी सुवर्णमाला ह्या आपल्या घरासमोर बसल्या होत्या. यावेळी मुलगा दत्ता याने घरात जाऊन लोखंडी पाईप आणला आणि जन्मदात्या आईला मारहाण करायला सुरुवात केली. यावेळी आरोपीनं आईच्या डोक्यात गंभीर घाव घातले. हे वार इतके भयंकर होते, की सुवर्णमाला रक्ताच्या थारोळ्यात पडल्या.

आरोपीनं ही मारहाण आपल्या लहान मुलाच्या डोळ्यादेखत केली आहे. यावेळी आरोपीच्या भावजयीने आरोपीला रोखण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याने भावजयीला देखील जीवे मारण्याची धमकी दिली. हा धक्कादायक प्रकार उघडकीस येताच जखमी सुवर्णमाला यांना तातडीने रुग्णालयात उपचारासाठी दाखल केलं. पण उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

## बिटरगाव ते चिंचोली रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे; रिपब्लिकन युवा सेनेचे जिल्हाधिकाऱ्याकडे तक्रार

### दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी



दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी :** प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेने अंतर्गत बिटरगाव ते चिंचोली होत असलेले रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असून सदर कामाची चौकशी करावी, अशी मागणी रिपब्लिकन युवा सेनेचे उमरखेड तालुका अध्यक्ष गौतम नवसागरे यांनी यवतमाळ जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद केले आहे की, प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत बिटरगाव ते चिंचोली महामार्ग ८.६७ किलोमीटर ३.७५ मीटर रुंदीचा करण्यात येत असून सदर रस्त्याचे काम हे टी अँड टी इन्फ्रा लि. पुणे ही कंपनी करीत असून सदर रस्त्याचे काम है अतिशय संथ गतीने तसेच निकृष्ट दर्जाच्या होत असलेल्या सत्याच्या कामासंदर्भात वेळोवेळी तक्रारी करण्यात आल्या आहेत.संबंधीत विभागाचे अधिकारी दुर्लक्ष करीत आहेत.तरी निकृष्ट दर्जाच्या होत असलेल्या रस्त्याच्या कामासदर्भात समिती गठीत करून चौकशी करावी, दोषी अधिकारी याच्यावर कार्यवाही करून इतरत्र बदली करावी तसेच संबंधित कंपनीवर कार्यवाही करून बांधकामाचा दर्जा सुधारण्यात यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनावर सुनिल चिंचोलकर, भीमराव खंदारे, साहेबराव कदम यांच्यासह इतर नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## तरुणाईच्या कार्यगौरव पुरस्काराचे थाटात वितरण

### निस्वार्थी समाजसेवा करणाऱ्या कार्यकर्त्यांना जपणे काळाची गरज - जयश्रीताई शेळके

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** लोक भूमिका घेत नाही.कोणतीही असो डावी की उजवी... या बाजूने की त्या बाजूने, पण भूमिका घेतली पाहिजे. भूमिका न घेणारे लोक प्रसंगी घातक ठरले आहे. सुनील सपकाळ यांनी सामाजिक भूमिका घेत दीर्घकाळ कार्य केले. निस्वार्थ भावनेने समाजसेवा करणाऱ्या कार्यकर्त्यांची मुळातच कमी आहे. जे आहेत त्यांना जपणे आपली सामाजिक जबाबदारी असल्याचे प्रतिपादन शिवसेना राज्य प्रवक्त्या जयश्रीताई शेळके यांनी केले.

सामाजिक कार्यकर्ते सुनील सपकाळ यांना तरुणाई फाउंडेशन च्या वतीने घोषित करण्यात आलेल्या कार्यगौरव पुरस्काराचे वितरण जिजाऊंचे तेरावे वंशज शिवाजीराजे जाधव,पत्रकार गणेश निकम, कैलास राऊत यांच्या हस्ते एक जुलै रोजी देशमुख गढी हातेडी या ठिकाणी आयोजित कार्यक्रमात करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी राजे जाधव होते.तर शिवसेना जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत, भाऊसाहेब शेळके, जिल्हा बँकेचे सीईओ डॉ.अशोकराव खरात, डॉ. अरविंद कोलते,प्रा. डी एस लहाने, मुक्तारसिंग भाऊ राजपूत,बाबासाहेब भोंडे, पी डी सपकाळ, सदानंद देशमुख,कर्नल जतकर,डॉ. शोन चिंचोले,माजी सभापती दिलीपराव जाधव, एडवोकेट जयसिंगराजे, डॉ. गजानन पडघन, डॉ.विकास बाहेकर, अनंत शिरसाट,साहित्यिक सुरेश साबळे, शाहिनाताई पठाण, नंदिनी टरपे, पद्माताई लांजेवार, पत्रकार संदीप वानखेडे, गणेश उबरहंडे, अमोल रिंढे,सुजित देशमुख, अनिल गाढे, विजय घ्याल, मोहम्मद सोफियान आदी उपस्थित होते. जिल्ह्यात विशेष सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तींना जिल्हा भूषण व कार्य भूषण पुरस्कार तरुणाई फाउंडेशन देऊळगाव मही च्या वतीने दरवर्षी देण्यात येतो.यावर्षी साठी सुनील सपकाळ यांची निवड करण्यात आली होती. सुनील सपकाळ यांनी गेल्या तीन दशकापासून सामाजिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य केले आहे.राजकारणामध्ये सक्रिय असले तरी त्यांचा खरा पिंड हा सामाजिकतेचा राहिला असल्याचे प्रास्ताविकामध्ये एडवोकेट जयसिंगराजे देशमुख यांनी सांगितले. यावेळी डॉक्टर कोलते, जालिंदर भाऊ बुधवत आदींनी विचार व्यक्त केले. सत्काराला उत्तर देताना सुनील सपकाळ यांनी कार्य गौरव मिळाल्याबद्दल आभार व्यक्त केले. चांगल्या गोष्टीच्या पाठीशी उभे राहणे, चांगल्या विचारांना बळ देणे हे विचार बुलढाणा जिल्ह्यात आणि शहरांमध्ये आजही तेवत असल्याचे ते म्हणाले.त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते कार्य गौरव पुरस्काराचे थाटात वितरण करण्यात आले.यावेळी शहरातून विविध क्षेत्रातील नामवंत मंडळी आवर्जून उपस्थित झाली होती. संचलन पत्रकार राजेंद्र काळे यांनी तर आभार प्रदर्शन गणेश सिंग राजपूत यांनी केले.




### बुलढाण्याने सामाजिक कार्य करणारी रत्न दिलीत- शिवाजी राजे

बुलढाण्याने सामाजिक क्षेत्रात कार्य करणारी अनेक रत्ने दिली.पूर्वी होऊन गेलेल्या लोकांनी केवळ जिल्ह्याचेच नव्हे तर राज्याचे नाव उज्वल केले. तर आता राजकारण, समाजकारण विविध आघाड्यांवर सुनील सपकाळ हे नाव गाजत आहे.यांनी केलेले कार्य हे ऐतिहासिक नोंद घ्यावी असेच असल्याचे शिवाजीराजे जाधव म्हणाले. बुलढान्यात अवघड कार्य सहज सोपे करणारी चाबी असा उल्लेख डॉक्टर कोलते यांनी करून सुनील सपकाळ यांच्या कार्याची माहिती दिली.